Rajarshi Shahu Jr College, Arts, Commerce & Science College
LIBRARY
GADHINGLAJ

ISSN 2277-8063 (Print)
June- 2023
Vol. XII / Issue. II / 2023
Impact Factor – 8.041

# Navjyot
## नवज्योत

**International Interdisciplinary Research Journal**
**Science, Humanities, Social Sciences,**
**Languages, Commerce & Management**

*(A Quarterly, High Impact Factor, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*Indexed by:*

Scientific Journal Impact Factor
TOGETHER WE REACH THE GOAL

IIJIF iiJS Cosmos

**Chief Editor**
**Prof. Dr. Ravindra P. Bhanage**
Dept. of Political Science,
Shivaji University,
Kolhapur.

*- Published by-*
**HOUSA Publication**

LIBRARY GADHINGLAJ



| | | | | |
|---|---|---|---|---|
| 44. | History | JRD Tata a Visionary Nation Builder | Waghmare Kabirdas Sudam | 170-174 |
| 45. | इतिहास | महाराष्ट्रातील चळवळीच्या इतिहास अनूषंगाने हैद्राबाद मूक्तीसंग्रमात मराठवाड्याचे योगदान | शिवाजी काशीनाथ गायकवाड | 175-177 |
| 46. | राज्यशास्त्र | स्वातंत्र्योत्तर कालखंडातील महाराष्ट्रामधील सामाजिक चळवळीचे नेतृत्व: एक अभ्यास | संजय बाळगोंडा खोत | 178-181 |
| 47. | राज्यशास्त्र | महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ आणि शेतकरी संघटनेतील गटबाजीचे राजकारण | प्रा. डॉ. संजय सागरु सपकाळ | 182-185 |
| 48. | इतिहास | श्री बापू तुकाराम गुरव : एक अपरिचित स्वातंत्र्यसैनिक | श्री. संदीप बळवंत गुरव | 186-189 |
| 49. | इतिहास | वसतिगृह चळवळीपाठीमागील छत्रपती शाहू महाराजांची भूमिका | श्री.संदिप वसंतराव जाधव | 190-194 |
| 50. | इतिहास | पर्यावरण चळवळीचे भारतीय आयाम व महात्मा गांधीजींच्या पर्यावरण विषयक विचारांची उपयुक्तता | समाधान आबा जाधव | 195-199 |
| 51. | इतिहास | तात्यासाहेब कोरे यांचे वारणा खोऱ्यातील सहकार चळवळीला लाभलेले योगदान | सौरभ राजेश झेंडे | 200-203 |
| 52. | इतिहास | समाज सुधारणेत सावित्रीबाई फुले यांचे योगदान | डॉ.हणमंत बाळकृष्ण नागणे | 204-206 |
| 53. | History | Role of Naval Central Strike Committee during RIN Mutiny 1946 | Mr. Somanath Satapute | 207-212 |
| 54. | History | Thoughts of Dr. Babasaheb Ambedkar and Challeges in The Implementation of Fundamental Rights | Harshal Shashikant Shinge | 213-219 |
| 55. | Economics | Economic Ideas of Mahatma Gandhi in Relevance of Globalization | Dr. Dnyanraja Chighalikar | 220-222 |
| 56. | राज्यशास्त्र | 1991 च्या मुक्त अर्थव्यवस्थेचे राजकीय क्षेत्रावर झालेला परिणाम | शरद विठ्ठल पाटील | 223-225 |
| 57. | राज्यशास्त्र | 1991 च्या मुक्त अर्थव्यवस्थेचे अनुसूचित जातीच्या चळवळीवरील राजकीय परिणाम | उषादेवी अंकुश कांबळे | 226-228 |
| 58. | राज्यशास्त्र | 1991 च्या नवीन आर्थिक धोरणाचे भारतातील निवडक राष्ट्रीय राजकीय पक्षाच्या धोरणावरील परिणाम | श्री राजेंद्र शरद जायकर<br>डॉ. टी. एम. पाटील | 229-234 |
| 59. | इतिहास | जागतिकीकरण व पर्यटन : एक चिकित्सा | डॉ. सुरेश मारुती चव्हाण<br>प्रा. प्रशांत प्रकाश कांबळे | 235-237 |
| 60. | Library & Inf science | जागतिकीकरणात महाविद्यालयीन ग्रंथपालाची बदलती भूमिका | समीर श्रीहरी कुलकर्णी | 238-241 |
| 61. | वाणिज्य | महात्मा गांधी : शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय विचार | प्रा. सचिन सोमगोंडा पाटील<br>प्रतीक्षा पुंडलिक दुंडगे | 242-244 |
| 62. | अर्थशास्त्र | 1991 च्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या धोरणाचे आर्थिक परिणाम | अश्विनी विपुल पाटील<br>शुभांगी वसंत ठोंबरे | 245-248 |
| 63. | राज्यशास्त्र | महिलांचे राजकारण विशेष संदर्भ कराड महानगरपालिका | तृप्ती रमेश मोरे | 249-252 |
| 64. | राज्यशास्त्र | भारतीय राजकारणाचे आघाड्यांच्या राज्यकारणाकडून बहुमताकडे वाटचाल- स्थिती आणि वास्तव | प्रा. डॉ. विक्रमराव नारायणराव पाटील | 253-257 |

(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)
NAVJYOT / VOL. XII / Issue- II
ISSN 2277-8063

# जागतिकीकरण व पर्यटन : एक चिकित्सा

**डॉ.सुरेश मारूती चव्हाण.** इतिहास विभाग प्रमुख कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय , गडहिंग्लज,जि.कोल्हापूर
**सहा.प्रा.प्रशांत प्रकाश कांबळे,** इतिहास विभाग कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय गडहिंग्लज,जि.कोल्हापूर

**प्रस्तावना -**

मानवाच्या उत्पत्ती पासुनच मानवाने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर केलेले दिसते.सुरवातीच्या काळात मानव वातावरणातील बदलानुसार एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी अन्नाच्या शोधात भंटकती करत होता.कालातरांने त्याच्या जीवनमानात बदल होऊन एका ठिकाणी स्थिर झाला.आणि त्यांच्या भंटकतीच्या स्वरूपात देखील बदल होत गेलेले दिसून येत.दरम्यानच मानवाने आपली प्रगती मोठ्या प्रमाणात केली. यातुन नवनवीन शोध लागले या शोधातूनच जगातील इतर देशांचा शोध लागला. त्यामुळे व्यापार व इतर कारणाच्या उद्देशाने वेगवेगळे देश एकमेकांच्या संपर्कात आले आणि यातूनच पर्यटन ही संकल्पना उदयास आलेली दिसून येते. सुरुवातीच्या काळात युरोपातील रोम लोकांनी पर्यटन ही संकल्पना रुजवण्याचा प्रयत्न केला.भारतात प्राचीन काळामध्ये सिंधू संस्कृतीच्या काळात अनेक परकीय प्रवासी भारतामध्ये व्यापार करण्याच्या उद्देशाने येत होते.पुढे युआन च्वांग ,फाहियान मध्ययुगात अल्बेरुनी, इ्बनबतुता यासारखे प्रवासी भारतीय संस्कृतीचा धर्माचा अभ्यास करण्यासाठी भारतात येत होते यावेळी ते संपूर्ण भारताचा प्रवास करत होते त्यातुन त्यांनी भारतातील वेगवेगळ्या सुंदर ठिकाणांचे वर्णन आपल्या प्रवासवर्णनातून केलेले आहे. अशाप्रकारे प्राचीन काळापासून अनेक पर्यटकांना भारत हा आकर्षित करत होता.यालाआधुनिक काळात अधिक गतिमानता मिळाली ती जागतिकीकरणामुळे म्हणूनच प्रस्तुत शोधनिबंधात जागतिकीकरण व पर्यटन यांची चिकित्सा करण्याचा प्रयत्न केला आहे.

**जागतिकीकरण आणि भारत-**

जागतिकीकरणाचा संबंध मुख्यत्वे करून आर्थिक बाबीशी निगडित आहे. आधुनिक काळातील जागतिकीकरणाच्या संकल्पनांचा उदय खऱ्या अर्थाने दुसऱ्या महायुद्धानंतर सुरू झाला. दुसऱ्या महायुद्धानंतर मागासलेल्या देशांच्या आर्थिक विकासासाठी आर्थिक व व्यापारी विषयक धोरण कसे असावेत याबाबत विचारविनिमय सुरू झाला. आणि त्यानंतर १९४४ मध्ये आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक,आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्य गट वगैरेंची स्थापना करण्यात आली. आणि यानंतर जागतिकरण-उदारीकरण व खाजगीकरणाचा वेग वाढू लागला सर्वसाधारणपणे जागतिकीकरण म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेचे जगाच्या अर्थव्यवस्थेशी एकत्रिकरण करणे होय. विसाव्या शतकाच्या शब्दकोशानुसार जागतिकीकरण म्हणजे जगभर पसरणे एकाच वेळी संपूर्ण जगाचा किंवा जागतिक सर्व लोकांचा विचार करणे होय.यामध्ये उद्योग,व्यापार,गुंतवणूक,भांडवल,प्रवास व तंत्रज्ञान याद्वारे राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेशी जोडली जाऊन संपूर्ण जगाची एक बाजारपेठ निर्माण करणे होय.जागतिकरणामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार हा मुक्तपणे करण्यात येतो.भांडवली वस्तूचे उत्पादन तंत्रज्ञान सेवा सुविधा यात भेदभाव केला जात नाही. थोडक्यात असे म्हणता येईल की राष्ट्र,राज्यांच्या भौगोलिक सीमांपलीकडे जाऊन आर्थिक व्यवहारांचा झालेला विस्तार म्हणजे जागतिकरण होय.

प्राचीन काळापासून भारताचा जागतिकरणाशी संबंध आलेला दिसून येतो जगातील एक सर्वोत्कृष्ट संस्कृती म्हणून सिंधू संस्कृती ओळखली जात होती. सिंधू संस्कृतीच्या काळातील अर्थव्यवस्था तत्कालीन जागतिक अर्थव्यवस्थेशी सलग्न असलेली सर्वोत्कृष्ट अर्थव्यवस्था होती या काळातील काही महत्त्वपूर्ण अशी शहरे निर्यातीसाठी उत्पादन करणारी शहरे म्हणून ओळखली जात होती यामध्ये कापड,तांबे, मणी,वस्तु यांची निर्यात मोठ्या प्रमाणात होत होती. पुढे गुप्तकाळात भारतातून परकीय देशात मोठ्या प्रमाणात निर्यात केली जात होती.भारताचा पूर्वेकडील देशाशी होणारा व्यापार व्यवहार अतिशय तेजित होता.पुढे मध्ययुगीन काळात अनेक परकीय आक्रमणे झाली.सुलतानशाही व मुघल कालखंडात भारतीय अर्थव्यवस्थाचा जगाच्या अर्थव्यवस्थेची

सहसंबंध आलेला दिसून येतो यानंतर पोर्तुगीज,इंग्रज,फ्रेंच,डच इत्यादी परकीय व्यापाराच्या निमित्ताने भारतामध्ये आले.त्यानंतर संपूर्ण भारतभर ब्रिटिशांनी आपले साम्राज्य विस्तारित केले.ब्रिटिशांनी भारतीय अर्थव्यवस्थेचा इंग्लंड देशाशी संबंध जोडून मोठ्या प्रमाणात भारतीयांची आर्थिक लूट केली पुढे १९४७ नंतर भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाला इतर देशाशी सलोख्याचे संबंध ठेवून आपला विकास करणे हेच ध्येय ठरवण्यात आले. पुढे १९९० च्या दरम्यान भारताने खऱ्या अर्थाने जागतिकरणाचे धोरण स्वीकारले भारतीय अर्थव्यवस्थेला गती देण्याच्या उद्देशाने पी.व्ही.नरसिंहराव सरकारने अर्थमंत्री मनमोहन सिंह यांच्या नेतृत्वाखाली भारताने १९९१ ला जागतिकरणाच्या धोरणाचा स्वीकार केला.आणि परकीय देशांना भारताची द्वारे खुली करण्यात आली.जागतिकीकरणामुळे नव्या तंत्रज्ञानाची आवक-जावक होऊ लागली.औद्योगिकरणाचा विकास होण्यास मदत झाली.मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या,संस्कृतीची देवाण-घेवाण घडून आली.त्यातून लोकांच्या राहणी मनामध्ये बदल घडून आला.एकूणच जागतिकीकरणाचा देशाच्या सामाजिक,राजकीय,आर्थिक,शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रावर मोठा प्रभाव पडलेला दिसून येतो.

**जागतिकीकरण व पर्यटन-**

प्राचीन काळापासून प्रवास हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक बनलेला दिसून येतो.आजच्या पर्यटन(Tourism) ही संज्ञा प्रवास (Tour) शब्दाशी संबंधित आहे मानवी संस्कृतीच्या विकासामुळे पर्यटनाला व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे.नागरिकरण,औद्योगीकरण राहणीमान शिक्षणाचा प्रसार व्यापार इतर उद्योग इत्यादींच्या विकासामुळे पर्यटनाला मोठी चालना मिळाली आहे.आधुनिक काळात जागतिकीकरणामुळे पर्यटनाला एक व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे पर्यटम हा एक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय उद्योग म्हणून विकसित झाला आहे.दळणवळणाच्या सोयी सुविधा मुळे कमीत कमी वेळात जगाच्या कोणत्याही प्रदेशात पोहोचणे शक्य झाले आहे.पर्यटनाच्या विकासासाठी अनेक घटक कारणीभूत असतात.यामध्ये ऐतिहासिक सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक घटकांना पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे स्थान आहे.भारत देश हा प्राचीन काळापासून पर्यटकांना आकर्षित करणारा देश म्हणून ओळखला जातो.भारताचा इतिहास हा मानवी मनाला भुरळ पाडणारा असाच आहे.भारतात भौगोलिक,प्राकृतिक विविधते बरोबरच लोकजीवन,कला,संस्कृती याबाबतीत ही विविधता आढळते भारतातील ऐतिहासिक, भौगोलिक ठिकाणी किल्ले, राजवडे, चित्रकला, हस्तकला, लोककला, नृत्य, संगीत, खेळ इत्यादी गोष्टी पर्यटकांना आनंद मिळवून देतात भारताच्या या विविधतेमुळे भारतामध्ये हजारो पर्यटन स्थळे निर्माण झाली आहेत. भारतात तील पर्यटनाचा विकास व्हावा म्हणून देशात तसेच विदेशात पर्यटन कार्यालये उभारण्यात आली आहेत. देशात सर्वप्रथम दिल्ली,कोलकत्ता,मुंबई व चेन्नई येथे प्रादेशिक पर्यटन कार्यालय सुरू करण्यात आले. तसेच भारतामध्ये विविध परदेशी पर्यटक आकर्षित व्हावेत यासाठी परदेशात देखील पर्यटन कार्यालय उघडण्यात आली आहेत. भारतात १४ मार्च १९५८ रोजी वाहतूक मंत्रालयात पर्यटनासाठी एक वेगळे खाते सुरू करण्यात आले. पुढे १९६६ मध्ये भारतीय पर्यटन विकास महामंडळाची स्थापना देखील करण्यात आली. आणि त्यानंतर १४ मार्च १९६७ मध्ये भारतात स्वतंत्र पर्यटन व नागरी हवाई वाहतूक विभागाची सुरुवात करण्यात आली. आज पर्यटन विकासाला चालना मिळण्यासाठी स्वतंत्र मंत्रालयाची निर्मिती करण्यात आली आहे त्याचा संपूर्ण कारभार हा एका स्वतंत्र मंत्रालयाकडे सोपवण्यात आला आहे.अशा पद्धतीने भारतामध्ये पर्यटनाला गतिमान करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत.एकुणच आधुनिक काळात अलिकडे भारतातील पर्यटनाचा झालेला विकास हा एक प्रकारे जागतिकीकरणाचाच परिपाठ आहे.

**जागतिकीकरणाचा पर्यटनावर झालेला परिणाम-**

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात पर्यटन उद्योगाला महत्त्वपूर्ण असे स्थान प्राप्त झाले आहे. पर्यटनासाठी अनेक देश ओळखले जात आहेत. पर्यटनामुळे बहुतांश देशाच्या अर्थव्यवस्थेला गती मिळालेली आहे. जागतिकीकरणामुळे संपूर्ण जग एकत्रित आल्यामुळे पर्यटनाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात विस्तारले गेले आहे.आज जागतिकीकरणामुळे पर्यटन क्षेत्रावरही परिणाम झालेला दिसून येतो.जसे की.

**१)परकीय चलन-**

पर्यटनातून देशाच्या अर्थव्यवस्थेला परकिय चलन प्राप्त होते. विदेशातील अनेक पर्यटक पर्यटनासाठी येत असतात. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात परकीय चलन प्राप्त होते.

**२)बाजारपेठांची निर्मिती-**

देश-विदेशातून पर्यटक पर्यटनासाठी आल्यानंतर मोठ्या प्रमाणात ऐतिहासिक वस्तू,कपडे शोभेच्या वस्तू, स्थानिक निर्मित कलाकृतीची खरेदी करत असतात. त्यामुळे त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात बाजारपेठांची निर्मिती झालेली दिसून येते.आणि त्यातून स्थानिक उद्योगाला चालना मिळालेली दिसून येते.

**३)जागतिक सामंजस्य निर्माण होण्यास मदत-**

पर्यटनामुळे एखाद्या देशाची सामाजिक, आर्थिक,सांस्कृतिक,धार्मिक माहिती पर्यटकांना मिळते आणि त्यातून त्या देशाबद्दल असलेले गैरसमज दूर होऊन त्या देशाबद्दल आपुलकी निर्माण होते.त्यातूनच जागतिक सामंजस्य निर्माण होण्यास मदत होते.

**४) रोजगाराची निर्मिती-**

पर्यटनातून बाजारपेठा, वस्तू खरेदी विक्री,हॉटेल व्यवसाय,वाहतूक व्यवस्था, पर्यटन व्यवस्था या ठिकाणी अनेक व्यक्तींना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात.

**५)ऐतिहासिक वास्तूंचे जतन व संवर्धन -**

भारतामध्ये अनेक परदेशी पर्यटक पर्यटनासाठी येत असतात भारतातील अनेक ऐतिहासिक ठिकाणी, किल्ले राजवाडे ऐतिहासिक वस्तूंचे पाहणी करत असतात यावरून त्याला भारताचा इतिहास समजतो त्यामुळे आपणाला अनेक ऐतिहासिक वस्तुंचे जतन व संवर्धन करण्याचे महत्त्व पटते.

**सारांश -**

जागतिकीकरणामुळे विविध देशांमध्ये पर्यटन उद्योगाला मोठ्या प्रमाणात गती मिळालेली दिसून येते.अनेक पर्यटक विविध देशांमध्ये पर्यटनासाठी ये-जा करत आहेत.त्यामुळे देशातील पर्यटनाची ठिकाणे विकसित होत आहेत.शासनाकडुन ही निधी उपलब्ध करून पर्यटन स्थळे सतत विकसित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. पर्यटनामुळे आपल्या भारताची प्राचीन संस्कृती जगातील लोकांना समजत आहे. भारतातील अनेक ऐतिहासिक ठिकाणे यांचा शोध घेतला जात आहे. अशा पद्धतीने जागतिकीकरणामुळे पर्यटन क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल घडून आलेला आहे.संपूर्ण जग एकत्रित आलेला आहे. पर्यटनातून जगातील अनेक संस्कृत्या,भाषा,वेशभूषा,राहणीमान यांची देवाण-घेवाण होत असताना दिसून येत आहे.थोडक्यात आज आपणास पर्यटनाचे जे विकसित स्वरूप पहावयास मिळते यामध्ये जागतिकीकरणाचा सिंहाचा वाटा राहिला आहे असेच म्हणावे लागेल.

**संदर्भ साधने -**

१) नलिनी पंडित जागतिकीकरण आणि भारत (२००४) लोकवाङ्मय गृह मुंबई
२) शिंदे एम.बी.(२००६)पर्यटन भूगोल,फडके प्रकाशन, कोल्हापूर
३) घारपुरे विठ्ठल (२००१) पर्यटन भूगोल, पिंपळापुरे अँड पब्लिकेशन्स,नागपूर
४) खतीब के.ए.(२००६) पर्यटन भूगोल, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे
५) डोळे ना.य.(१९९७) उदारीकरण:नवे आर्थिक धोरण,विद्या प्रकाशन, नागपूर
६) ढवळीकर म.क.(२००४) सिंधू संस्कृती,राजहंस प्रकाशन, पुणे
७) डॉ.माने, डॉ.महाडिक,(२००९) शिवकालीन किल्ल्यांचा समग्र इतिहास, शिवनेरी प्रकाशन, अमरावती
८)शहा.जी.बी.(२००३) महाराष्ट्रातील उपेक्षित दुर्गांचा इतिहास,सुमेरू प्रकाशन,डोंबिवली
९) गावडे पु.ल.(२०१०) भटकंती,उत्कर्ष प्रकाशन,पुणे
१०) भोसले संभाजी (२०११) सफर ऐतिहासिक मुंबईची, स्नेहा प्रकाशन,पुणे
११) दैनिक वर्तमानपत्र -सकाळ,पुढारी, तरुण भारत,लोकमत
१२) वेबसाईट -www.tourism.gov.in